MHST200006332020

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७/२०२३ मधील निशाणी क्र.३६ वरील आदेश</u>**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सरनाम्यामध्ये दुरूस्ती करणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, सामनेवाला क्रं.५ मयत हलीमा इब्राहिम काझी यांना तीन कायदेशीर वारस अब्दुला इब्राहिम काझी (मयत), गुलाबातु इब्राहिम काझी, फतिमा इब्राहिम शेख असे आहेत. परंतु, फतिमा इब्राहिम शेख यांना अर्जात/दाव्यात नजरचुकीने समाविष्ट करणेचे राहुन गेले होते. तरी, अर्जातील सरनाम्यामध्ये फतिमा इब्राहिम शेख यांना समाविष्ट करुन घेण्यास परवानगी मिळावी. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. सामनेवाला यांनी सदर अर्जावर म्हणणे देवुन योग्य व न्यायाचे आदेश होणेबाबत कथन केले.

४. अर्जदार यांनी प्रस्तुतचा मुळ अर्ज स्पे.दि.मु.नं.४४/१९९७ पुन्हा फैलावर घेणेकरीता दाखल केला आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. अशी दुरुस्ती केल्यास मुळ अर्जाचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही असे मला वाटते. सदरची दुरुस्तीस परवानगी दिल्यास सामनेवाल्याचे कोणतेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**<u>आदेश</u>**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे १४ दिवसांचे आत दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.09.11 17:50:52 +0530

स्थळ : वाई. ( ए. ए. पाचरणे )

दिनांक : ११.०९.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.